## प्रसिध्दी पत्रक

**आरोपी लोकसेवक श्री प्रकाश धोडींबा सोनवणे वय 49 वर्षे, पोलीस नाईक, ब.नं.18 नेमणुक पोलीस स्टेशन उस्मानपुरा यांनी तक्रारदार यांच्याकडुन रुपये. 5000/- लाचेची रक्कम स्विकारल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे उस्मानपुरा औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | आरोपी लोकसेवक श्री प्रकाश धोडींबा सोनवणे वय 49 वर्ष पोलीस नाईक, ब.नं.18 नेमणुक पोलीस स्टेशन उस्मानपुरा, औरंगाबाद शहर |
| लाच मागणी रक्कम | :- | 5,000/- रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 5000/-रुपये |
| तपास अधिकारी | :- | श्री. नंदकिशोर क्षीरसागर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांनी दुचाकी वाहन करीता बजाज फायनान्स कंपनी कडुन वाहन कर्ज घेतले होते. सदर कर्ज परतफेड न केल्याने तक्रारदार यांची दुचाकी वाहन फायनान्स कंपनीचे ओढुन नेली व तक्रारदार यास मारहाण केली. त्याअनुषंगाने तक्रारदार यांनी पोलीस स्टेशन उस्मानपुरा येथे रितसर तक्रार नोंदविली होती. सदर तक्रारी अर्जामध्ये तक्रारदार यांची फायनान्स कंपनीने ओढुन नेलेली दुचाकी वाहन परत मिळुन देण्यासाठी व अर्जावर कारवाई करण्यासाठी . |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांनी दुचाकी वाहन खरेदी करीता बजाज फायनान्स कंपनीकडुन दुचाकी वाहन कर्ज घेतले होते. सदरचे कर्ज परतफेड न केल्याने बजाज फायनान्स कंपनीने तक्रारदार यांची दुचाकी वाहन ओढुन नेले व तक्रारदार यांना मारहाण केली होती. त्याबाबत तक्रारदार यांनी पोलीस स्टेशन उस्मानपुरा येथे रितसर तक्रार नोंदविली आहे. सदर तक्रारी अर्जावर कारवाई करण्यासाठी व दुचाकी वाहन परत मिळुन देण्यासाठी तक्रारदार, आरोपी लोकसेवक श्री प्रकाश धोडींबा सोनवणे पोना/18 यांना भेटले असता त्यांनी तक्रारदार यांच्याकडे कायदेशीर कारवाई करण्यासाठी 5000/- रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन केलेल्या पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवक श्री प्रकाश सोनवणे यांनी तक्रारदार यांच्याकडे 5000/- लाचेची मागणी करुन पंच साक्षीदारांसमक्ष स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे दि. 24/11/2022 रोजी सापळा आयोजीत केला असता, नमूद आरोपी लोकसेवक श्री प्रकाश धोडींबा सोनवणे, पोलीस नाईक ब.नं.18 नेमणुक पोलीस स्टेशन उस्मानपुरा औरंगाबाद शहर यांनी पंच साक्षीदारा समक्ष लाचेची रक्कम रुपये 5000/- रुपये पोलीस स्टेशन समोरील रस्त्याच्या बाजुला चहाच्या टपरी येथे स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.ठाणे उस्मानपुरा औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक श्री. मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नंदकिशोर क्षीरसागर यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पो.हवा. राजेंद्र जोशी, पो.ना.सुनिल पाटील, अशोक नागरगोजे, पो.अ. विलास चव्हाण, चालक- चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद

ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994

पोलीस उप अधीक्षक :- 9356115189

(मारुती शंकर पंडित)
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद.